PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	TIMES OF INDIA
DATE	24/11/2019
LANGUAGE	ENGLISH
SUBJECT	Press clippings of Agro-vision - 24/11/2019

A kg of cow dung will sell for ₹50: Giriraj

Sarfaraz Ahmed
@timesgroup.com

Nagpur: Union minister for animal husbandry, dairy development and fisheries Giriraj Singh on Saturday said cow dung would be sold for a price of minimum ₹50 a kg when he implements his model of rescuing stray cattle.

The minister, who had previously courted controversies on mob lynching over alleged beef and cow-vigilantism, didn't elaborate on his proposed model for stray cattle during his speech at Agrovision at Suresh Bhat Auditorium.

"Cow, buffalo and stray animals population has increased so much that they are roaming on roads. I will ensure that a kg of cow dung will sell for a minimum ₹50. When this happens, no one will abandon cattle to stray on roads. Then, in case someone sees these cattle on roads they will take them home to earn Rs50 per kg," Singh said.

He also ridiculed those who prefer to call cattle strays. "During the last parliament session, a question was raised in the house about the fate of stray cattle. I replied by saying that these are helpless animals and it is we who are stray (awara) who let them loose. It is my life's aim to help these helpless animals whether I remain a minister and MP or not," he said.

The minister said he will campaign across the country and set up a model. "Once this model is implemented, it will bring about a revolution in the country," he said.

Lamenting the lack of researchers in agriculture, Singh said, "Once I was invited to Banaras Hindu University where school kids were present. When I asked how many wanted to be an IAS, IPS, doctor or engineer, many raised their hands. But when I asked how many wanted to be agriculture scientist, only 15, including five girls, raised their hands. Five withdrew when I asked the VC to note down their names and I will track their careers," he said.

Comparing the present agrarian crisis with a mythological tale, he said every one wants to go to heaven but no one wants to die. "After lunch, I asked kids at BHU if they liked the food. They had no answer when I asked if they can eat a software chip! Everyone wants food but no wants to be a farmer," he said.

He appealed to the farmers to go for livestock rearing with farming. "If this model had been there, the country would have be much ahead," he said.

Parikshit Harsole

The minister spoke at Agrovision at Suresh Bhat Hall on Saturday

> Cow, buffalo and stray animal population has increased so much that they are roaming on roads. I will ensure that a kg of cow dung will sell for a minimum ₹50
>
> **GIRIRAJ SINGH** | UNION MINISTER FOR ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES

THE HITAVADA
(ENGLISH)
DT. 24/11/2019

Take up dairy farming, fishery & livestock to increase income: Giriraj

■ Business Bureau

UNION Minister for Fisheries, Animal Husbandry and Dairying Giriraj Singh on Saturday said that progress of farmers is not possible if they continue to practice traditional methods of farming.

"It is necessary that the farmers adopt new technology and also adopt dairy farming, fishery and livestock to increase their income," he said while addressing the large gathering of farmers and others at the seminar organised in Suresh Bhat Auditorium in Reshimbagh on Saturday.

Giriraj Singh inaugurated the seminar in presence of Dilip Rath, Chairman of National Dairy Development Board (NDDB), Dr C D Mayee, President of Agrovision Consultant Committee, Ravindra Boratkar, Organising Secretary of Agrovision, Dr Ashish Paturkar, Vice Chancellor of MAFSU, Nagpur, Prashant Wasnik, of Maharashtra Animal and Fishery Sciences University, Nagpur, M B Patil, Director, Central Institute for Cotton Research, Nagpur, P A Ghosh, Dr N P and Dr R D Kokne.

Union Minister for Fisheries, Animal Husbandry and Dairying Giriraj Singh lighting the traditional lamp to inaugurate the seminar organised in Suresh Bhat Auditorium, Reshimbagh on Saturday.

Giriraj Singh stressed on the need to change the cropping pattern too, saying that this was the need of the hour. He also conveyed that presently India holds leadership position in milk production but it is due to the high cost of production that it becomes unaffordable and thus it does not yield much benefit to the farmers. To counter this situation, farmers should rear two or five cattle which would yield them organic compost or vermicompost.

Similarly, based on requirement they can produce cattlefeed and can further engage in poultry breeding which would create a holistic cycle of milk, cattle feed, bio-gas, compost thus making the farm and farmer self-sufficient, he said.

"We are expecting large-scale foreign investments in this area in coming 10 years. Alongside this there would be growth in milk production and processing industry," he said.

Singh also expressed hope that in times to come people from agriculture based industry could lead the country to glory.

Dr C D Mayee said, "Agrovision is initiated with the sole objective of contributing to farming and farmers. This has caused a very positive impact in the regio
has also been instrumental i
increase in milk productio

Dr Paturkar emphasised o
provision of nutritional fod
ensure production of more c
tity and qualitative milk. D
his address he highlighted
they have entered into a co
to process regular fodder s
it can be adapted for
accordingly.

The entire programme
conducted by Renuka Des
Ravindra Boratkar propose
vote of thanks.

The seminar was attend
a large number of farmers

Fodder to be grown on MAFSU land: Dilip Rat

IT IS very important to generate good and nutritional fodde
take the milk production in Vidarbha upto 3 to 4 lakh litres. For
same, National Dairy Development Board (NDDB) and Maharas
Animal and Fishery Sciences University (MAFSU) have entered
a pact to grow high-nutrition cattle feed on the vacant land w
in university premises, informed Dilip Rath, Chairman of Nati
Dairy Development Board.

This would benefit the local farmers of the region. Rath
informed the gathering about Agriculture Training Centres c
ing up in Amravati and Wardha shortly, he added.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	LOKMAT TIMES
DATE	24/11/2019
LANGUAGE	ENGLISH
SUBJECT	

Livestock rearing can develop farmers, says Giriraj Singh

Seminar on 'Milk production and processing in Vidarbha' organised by Agro Vision

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR, NOV 23

In India agriculture production is done as per the size of the land. Hence farmers should increase livestock and develop themselves. This would definitely increase the economic situation in the country. If livestock increases in the country, it would increase employment for farmers and youth as livestock would give definite 365 days work to farmers, stated Union minister of animal husbandry, dairying and fisheries Giriraj Singh.

He was speaking as the chief guest during a seminar on 'Milk production and processing in Vidarbha' held at Kavivarya Suresh Bhat auditorium by Agro Vision. NDDB chairman Dilip Rath, Agriculture Scientists' Recruitment Board chairman A K Mishra, Ashish Paturkar, Prashant Wasnik, N V Patil, P K Ghosh, R D Kokne, Satyander Singh Arya, Laxminarayan Mishra, C D Maye and Ravi Boratkat were present on the dais.

Union minister for animal husbandry, dairying and fisheries Giriraj Singh addressing the gathering at Suresh Bhat auditorium in the city on Saturday.

Giriraj Singh stated that Union Minister Nitin Gadkari's work to provide information to farmers and youth through Agro Vision was praiseworthy. Farmers should change crop pattern and start livestock rearing. The country produces 1.70 lakh tons milk and it is increasing every year.

Dairy has 22 percent share. Agriculture based livestock would have developed the country faster. Livestock exports is 75 to 80 thousand crores which is double the textile industry. CIR has stated that huge investments would be made in agriculture base food processing industry.

Fodder would also have to be increased along with milk. Tragically farmers do not want their children to become farmers. People will turn towards agriculture if investment value is less, Giriraj Singh said.

Dilip Rath said that, Agro Vision has brought about huge transformation in Vidarbha's milk production. Mother Dairy has a target of collecting 3.5 lakh liters milk per day within two years.

Dr C D Maye introduced the programme while Ravi Boratkar proposed vote of thanks. Farmers in large numbers attended the programme.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	NAVBHARAT
DATE	24/11/2019
LANGUAGE	HINDI
SUBJECT	

पशुसंवर्धन व कृषि व्यवसाय एक-दूसरे के पूरक

एग्रोविजन में केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह ने कहा

व्यापार संवाददाता

नागपुर.- पशुसंवर्धन और कृषि व्यवसाय एक-दूसरे के पूरक हैं. दुधारु जानवरों की तरह ही बिना दूध देने वाले जानवरों का भी मल-मूत्र का उपयोग रासायनिक खाद के रूप में किया जायेगा, तो किसानों को लाभ हो सकता है. इससे कृषि उत्पादन में बढ़ोतरी भी हो सकती है. यह कहना है केंद्रीय पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्य विकास मंत्री गिरिराज सिंह का. वे 11वीं एग्रोविजन कृषि प्रदर्शनी में विदर्भ दुग्ध उत्पादन विकास व दुग्ध प्रक्रिया के अवसर पर आयोजित एक दिवसीय कार्यशाला के उद्घाटन पर संबोधित कर रहे थे. इस अवसर पर राष्ट्रीय डेयरी विकास मंडल के (एनडीडीबी) अध्यक्ष दिलीप रथ, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ के कुलगुरु डा. आशीष पातुरकर प्रमुखता से उपस्थित थे.

जैविक खाद का निर्माण करें किसान

उन्होंने कहा कि केवल कृषि आधारित व्यवसाय के कारण एक व्यक्ति को वर्ष में 100 दिन रोजगार मिल सकता है, लेकिन वही रोजगार पशुपालन व्यवसाय के कारण वर्ष के 300 दिन मिल सकता है. कुक्कुट व बकरी पालन से होने वाले मल को कंपोस्ट कर उससे जैविक खाद निर्माण करने के लिए किसानों को आगे आना चाहिए. युवा पीढ़ी को कृषि अनुसंधान के साथ पशुसंवर्धन विकास से संबंधित शिक्षा पाठ्यक्रम की ओर रुख करना चाहिए.

3.50 लाख लीटर दूध संग्रह का लक्ष्य

रथ ने कहा कि एनडीडीबी द्वारा विदर्भ के किसानों से दूध संग्रह में नया कीर्तिमान स्थापित किया गया है. दूध संग्रहण की राशि सीधे किसानों के बैंक खाते में पहुंचती है. मार्च महीने तक दूध संग्रह के लिए 3,000 गांव में 10,000 हजार किसानों को जोड़कर 3.50 लाख लीटर प्रति दिन दूध संग्रह का लक्ष्य है. एनडीडीबी के माध्यम से प्रगतिशील किसानों को 'माइक्रो ट्रेनिंग सेंटर' की स्थापना करने का निर्णय लिया गया है. इस सेंटर्स के माध्यम से चारा उत्पादन, पशुपालन संदर्भ में वैज्ञानिक ज्ञान किसानों को दिया जायेगा. यह सेंटर 3 जिलों में स्थापित किये जाने वाले हैं. हाइब्रिड नेपियर, मोरिंगा, मक्का या चारा जैसे पशुखाद्य के उपयोग के लिए किसानों को जागरूक करने का प्रयास किया जायेगा. कार्यशाला में राज्य के विविध हिस्सों से पशुपालक व दुग्ध व्यवसाय वाली संस्थाएं, राज्य व केंद्र सरकार के दुग्धविकास व पशुसंवर्धन विभाग के अधिकारी उपस्थित थे.

छोटे बच्चों व युवाओं में उत्साह

रेशिमबाग मैदान में लगी एग्रोविजन प्रदर्शनी किसानों के साथ स्वयंरोजगार की शुरुआत करने वालों के लिए वरदान साबित हो रही है. विदर्भ के साथ देश के अन्य राज्यों से आये किसान नई-नई टेक्नोलाजी, फसलों के उपयोग की मशीनरी के साथ अन्य तरह के मत्स्य पालन, पशुपालन व उनसे संबंधित रोजगार के अवसर वाले स्टाल को लेकर बहुत अधिक उत्सुक हैं. छोटे बच्चे तो बच्चे, युवा भी वर्तमान में खेती में उपयोग होने वाली नई-नई टेक्नोलाजी को देखकर अपना ज्ञान का भंडार बढ़ा रहे हैं. प्रदर्शनी देखने की उत्सुकता ऐसे लोगों में भी है, जिनका खेती-किसानी से कोई संबंध नहीं है. प्रदर्शनी में कम्पनियों ने एक से बढ़कर एक यंत्रों को पेश किया है.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER : LOKMAT SAMACHAR
DATE : 24/11/2019
LANGUAGE
SUBJECT

पशुधन बढ़ाकर ही हो सकेगा किसानों का विक

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह ने कहा, एग्रोविजन में डेयरी विकास पर कार्यशाला

लीड स्टोरी

किसानों को पशुधन बढ़ाकर स्वयं का विकास करते हुए आय बढ़ानी चाहिए. इससे देश की अर्थव्यवस्था आगे बढ़ेगी. देश में पशुधन बढ़ने पर किसान और युवाओं के लिए रोजगार के अवसर बढ़ेंगे. पशुधन से किसानों को सालभर निश्चित रूप से काम मिलेगा.

नागपुर। 23 नवंबर। लोस सेवा

एग्रोविजन की ओर से रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृह में शनिवार को 'विदर्भ में दुग्धोत्पादन एवं प्रक्रिया' विषय पर कार्यशाला का आयोजन किया गया. इस दौरान मुख्य अतिथि के रूप में संबोधित करते हुए केंद्रीय पशुधन, दुग्ध विकास और मत्स्य पालन मंत्री गिरिराज सिंह ने कहा कि देश में जितनी कृषि भूमि है, उतना ही उत्पादन है.

कार्यक्रम के दौरान मंच पर एनडीडीबी के अध्यक्ष दिलीप रथ, कृषि विशेषज्ञ चयन मंडल के अध्यक्ष डॉ. एन. के. मिश्रा, माफसू के कुलगुरु डॉ. आशीष पातुरकर, डेयरी तकनीकी ज्ञान महाविद्यालय के डीन डॉ. प्रशांत वासनिक, मीरत के पशु अनुसंधान संस्था के संचालक डॉ. एन.वी. पाटिल, पशु अनुसंधान संस्था के पूर्व संचालक डॉ. पी.के. घोष, इंडियन डेयरी एसोसिएशन के चेयरमैन डॉ. आर.डी. कोकणे, डॉ. सत्येंदर सिंह आर्य, लक्ष्मीनारायण मिश्रा, सत्र के समन्वयक एवं एग्रोविजन सलाहकार समिति के अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी और आयोजन सचिव रवींद्र बोरटकर उपस्थित थे.

कविवर्य सुरेश भट सभागृह में आयोजित कार्यशाला को संबोधित करते हुए केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह.

इस दौरान गिरिराज सिंह ने आगे कहा कि गडकरी एग्रो विजन के जरिए किसान और युवाओं को कृषि विषयक जानकारी देने का सर्वोत्तम कार्य कर रहे हैं. उन्होंने किसानों से क्रॉप पैटर्न बदलने, पशुधन बढ़ाने की अपील करते हुए कहा कि देश में 17 लाख टन दूध का उत्पादन होता है. यह हर साल बढ़ रहा है. डेयरी में 22 फीसदी हिस्सेदारी है. कृषि आधारित पशुधन होता तो देश का विकास तेजी से हुआ होता. उन्होंने कहा कि देश में पशुध
70 से 80 हजार करोड़
यह वस्त्रोद्योग क्षेत्र से
आधारित खाद्यान्न प्रि
करोड़ों रुपए का नि
बात सीआईआर ने क
के लिए गौरव की ब
दूध के साथ चारे क
करना जरूरी है. उन्
जताते हुए कहा कि
अपने बेटों को किसान
उत्सुक नहीं हैं. यह देश
की बात है. खेती में ला
होने पर लोग खेतीब
लिए आगे आ सकते हैं

दिलीप रथ ने कहा
दुग्ध उत्पादन के क्षेत्र में
कारण बड़ा परिवर्तन
साल में 3.5 लाख लीट
का लक्ष्य रखा है. प्र
सी.डी. मायी ने दिया.
बोरटकर ने माना.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	LOKSATTA
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

गायीच्या शेणाला प्रतिकिलो पन्नास रुपये दर मिळावा

केंद्रीय मंत्री गिरीराज सिंग यांची अपेक्षा

प्रतिनिधी, नागपूर

आता दुधाला चांगला भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत आहे. येणाऱ्या काळात गायीच्या शेणाला जर प्रतिकिलो पन्नास रुपये दर मिळायला हवा. असे झाले तर रस्त्यावर जनावर मोकाट दिसणार नाहीत. नागरिक त्या गुरांचे स्वतःच्या घरी पालनपोषण करतील, असे प्रतिपादन केंद्रीय पशू संवर्धन, दुग्ध व मत्स्य विकास मंत्री गिरीराज सिंग यांनी केले.

रेशीमबाग मैदानावर आयोजित ॲग्रोव्हीजन कृषी प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी सुरेश भट सभागृहात 'विदर्भात दुग्धोत्पादनाचा विकास आणि प्रक्रिया' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ, माफसुचे कुलगुरू प्रा. आशिष पातुरकर, डॉ. प्रशांत वासनिक, डॉ. एम. व्ही. पाटील, डॉ. पी. के. घोष, डॉ. आर. डी. कोकणे आदी उपस्थित होते. यावेळी गिरीराज सिंग म्हणाले, दुग्ध उत्पादानासाठी अनेक सवलती दिल्या. ग्रामीण भागातील शेतकरी गोपालनाकडे वळला आहे. विदर्भातून मोठ्या प्रमाणात दुधाची आवक वाढली असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. गाईच्या शेणापासून आज वेगवेगळी आयुर्वेदिक औषधे तयार होऊ लागली आहे. त्यामुळे शेणाला महत्त्व आले आहे. येणाऱ्या काळात शेणाला जर चांगली किंमत मिळाली तर रस्त्यावर मोकाट जनावरे कमी होतील, असेही गिरीराजसिंग म्हणाले.

काही दिवसांपूर्वीच लाँच करण्यात आलेल्या मावा संत्रा बर्फीला चांगली मागणी आहे. त्याच धर्तीवर गोरसपाक केवळ वर्धा जिल्'ापुरता न राहता तो सर्वत्र पाठवला जसाणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ यांनी दिली. संचालन रेणुका देशकर यांनी तर प्रास्ताविक सी.डी. मायी यांनी केले.

नाबार्डच्या योजना समजून घेण्याचे आवाहन

नाबार्ड ही ग्रामीण विकासाला चालना देणारी भारत सरकारची अधिकृत संस्था आहे. या संस्थेमार्फत अनेक शेतकऱ्यांच्या उपयोगाच्या योजना राबविण्यात येतात. त्या योजना नेमक्या कुठल्या अन् त्याचे लाभ कसे मिळवायचे याची माहिती शेतकऱ्यांनी समजून घ्यावी अन् उत्कर्ष साधावा, असे आवाहन कृषी वित्त पुरवठा या विषयाच्या अनुषंगाने ॲग्रो व्हीजनमध्ये पार पडलेल्या कार्यशाळेत मैथिली कोवे यांनी केले.

SAKAL DT.

पशुधन विकास, शेती व्यवसाय एकमेकांना पूरक

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह : ॲग्रोव्हिजन परिषदेचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २३ : पशुसंवर्धन आणि शेती व्यवसाय हे एकमेकांना पूरक असून दुधाळ जनावरांइतकेच भाकड जनावरेसुद्धा उपयुक्त आहेत. त्याचे शेण व मलमूत्राचा वापर शेतकऱ्यांनी रासायनिक खत म्हणून केल्यास शेतीवरील रासायनिक खतांचा भार कमी होईल व कृषी उत्पादनातसुद्धा वाढ होईल, असे प्रतिपादन केंद्रीय पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्य विकास मंत्री गिरिराज सिंह यांनी आज केले.

नागपूरमध्ये अकराव्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनानिमित्त कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित 'विदर्भात दुग्ध उत्पादनाचा विकास व दुग्ध प्रक्रियेतील संधी' या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते आज झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे (एनडीडीबी) अध्यक्ष दिलीप रथ, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आशीष पातूरकर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

एनडीडीबीने विदर्भातील शेतकऱ्यांकडून दूध संकलनामध्ये नवे विक्रम प्रस्थापित केले असून शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये दूध संकलनाची रक्कम थेट पोहोचत असल्याचे एनडीडीबीचे अध्यक्ष दिलीप रथ यांनी यावेळी सांगितले. मार्च महिन्यापर्यंत दूध संकलनासाठी तीन हजार गावांमध्ये दहा हजार शेतकऱ्यांना जोडणार असून दूध संकलनाचे लक्ष साडेतीन लाख लिटर प्रति दिवस करणार असल्याचे त्यांनी सांगितले. एनडीडीबीमार्फत प्रगतिशील शेतकऱ्यांच्या 'मायक्रो ट्रेनिंग सेंट'ची स्थापना करण्याचा निर्णय झाला असून या सेंटर्समार्फत चारा उत्पादन, पशुपालन यासंदर्भातील शास्त्रशुद्ध ज्ञान शेतकऱ्यांना देण्यात येईल. असे सहा सेंटर तीन जिल्ह्यात स्थापन करण्यात येतील असे त्यांनी सांगितले. हायब्रीड नेपियर, मोरिंगा, मका या चारासदृश पशुखाद्याच्या वापरासाठी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेला राज्यातील विविध भागांतून आलेले पशुपालक व दुग्ध व्यवसायातील संस्था, राज्य व केंद्र शासनाच्या दुग्धविकास व पशुसंवर्धन विभागात विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

ॲग्रो व्हिजन
कार्यशाळा, राष्ट्रीय कृषि प्रदर्शन व परिसंवाद

वर्षभर रोजगार शक्य

केवळ शेती आधारित व्यवसायामुळे एखाद्याला वर्षात शंभर दिवस रोजगार मिळत असेल तर तोच रोजगार पशुपालन व्यवसायामुळे वर्षभर शक्यता असते, असे गिरिराज सिंह यांनी पशुधनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले. कुक्कुट पालन, बकरी पालन यातून होणाऱ्या मल व विष्ठेचे कंपोस्ट करून त्याच्या सेंद्रिय खताची निर्मिती करण्याकरिता शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तरुण पिढीने कृषी संशोधन तसेच पशुसंवर्धन विकास यासंदर्भातील शिक्षण अभ्यासक्रमाकडे वळावे अशी अपेक्षाही गिरिराज सिंह यावेळी व्यक्त केली.

SAKAL
DT. 24/11/2019

24/11/2019

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	SAKAL
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

रेशीमबाग : शेतीउपयोगी वस्तूंसह सर्वांनाच उपयुक्त ठरेल अशा बर्याच गोष्टी प्रदर्शनात आहेत. सेंद्रिय फळे आणि गृहपयोगी वस्तूंना नागरिकांची पसंती मिळत आहे. प्रदर्शनातील काही निवडक स्टॉल्स.

सौरऊर्जेबाबत सर्वाधिक उत्सुकता

नागपूर : ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात महाऊर्जा संस्थेने सौरऊर्जा प्रकल्पांच्या स्टॉलवर शेतकरी आणि नागरिकांची उत्सुकतेपोटी सर्वाधिक गर्दी होत आहे. महाऊर्जाच्या या स्टॉलवर रूफ टॉप सोलर प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी, सौरऊर्जेवर चालणारा ग्रामीण पाणीपुरवठा, मायक्रो ग्रीड सोलर प्रकल्प, पाण्यावर तरंगता सौरऊर्जा प्रकल्प, सौर ऊर्जेवर चालणारे कोल्ड स्टोरेज, इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन, पवनऊर्जा प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प, सौर गोठा व त्यापासून पशुसंवर्धन, सौभाग्य योजना अशा प्रकल्पांचे आले आहे. अत्यंत सुबक आणि जिवंतपणा असलेले हे मॉडेल्स महाऊर्जाचे नागपूर येथील प्रादेशिक संचालक सारंग महाजन यांच्या नेतृत्वात नागपूरच्या चमूने प्रचंड मेहनतीने तयार केले आहेत. केवळ एका दिवसात १५ हजारांवर लोकांनी या स्टॉलला भेट देऊन महाऊर्जाच्या प्रकल्पांची माहिती घेतली.

आगामी काळ हा सौर ऊर्जेचा, शाश्वत ऊर्जेचा असल्याने माजी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सौरऊर्जेबद्दल जनजागृती करून या ऊर्जेचे महत्त्व लोकांसमोर आणले आहे. स्टॉलला केंद्रीय मंत्री नितीन

नागपूर : सौरऊर्जेचे मॉडेल बघण्यासाठी नागरिकांनी केलेली गर्दी.

उद्घाटन केले. याप्रसंगी महाऊर्जाचे महासंचालक कांतिलाल उमाप आणि अतिरिक्त महासंचालक वाघमारे उपस्थित होते.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	SAKAL
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

अद्ययावत चरखा वेधून घेतोय लक्ष

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २२ : दशकपूर्ती सोहळा पूर्ण करून अकराव्या वर्षात यशस्वीपणे कार्य करणाऱ्या ॲग्रोव्हिजन प्रदर्शनाचा प्रारंभ शुक्रवारी रेशीमबाग मैदानावर झाला. या प्रदर्शनात देशभरातून शेतकरी, शेतीत वेगवेगळे प्रयोग करणारे उत्पादक सहभागी झाले आहेत. अनेक नावीन्यपूर्ण उत्पादन येथे बघायला मिळत असून, यात प्रामुख्याने कापसापासून धागा तयार करणारा अद्ययावत चरखा आणि फुलांच्या लागवडीची माहिती देणारा मंगरुळू येतील व्यापाऱ्याचा स्टॉल नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

धागा बनवणारी आजी.

घरी बनवा खादी कपड्याचा धागा

महाराष्ट्र राज्याच्या खादी आणि ग्रामोद्योग आयोगातर्फे शेतकऱ्यांना खादी व्यवसायाची माहिती देण्यात येते. गेल्या काही वर्षांपासून मध्य भारतातील शेतकरी खादी कपड्याच्या निर्मितीकडे वळतो आहे. घराघरांत चरख्यावर धागा तयार होऊ शकतो हे दाखविण्यासाठी ॲग्रोव्हिजन प्रदर्शनात एक आजी धागा बनवताना दिसते: हा चरखा मानवचलित असून, कापसापासून हजार मीटरचे धाग्याचे रील तयार करता येणार आहे. पुढे हे रील खादीचे कपडे तयार करण्यासाठी उपयोगात येत असून, त्यापासून शर्ट, बंडी, साडी तयार होत असल्याची माहिती प्रदर्शनात येणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येते आहे. विविध आकारांचे धागे या चरख्यापासून तयार होतात.

फुलांच्या स्टॉलवर गर्दी होत असून, फूल दाखविताना विक्रेता.

फुलांनी सजवा घर

घर सुशोभित ठेवण्यासाठी उपयोगात येणारी मनमोहक फुलांचा स्टॉल ॲग्रोव्हिजन प्रदर्शनात येणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष वेधून घेते. हा फुलविक्रेता मंगरूळु येथून आला आहे. त्याच्या स्टॉलवर साठ प्रकारच्या फुलांच्या प्रजाती विक्रीस उपलब्ध असून, फुलांची रोपटे उगवल्यावर कशी दिसतील तेदेखील येथे पाहता येते. ही बियाणे कुंडीत लावली की, दोन महिन्यांनी फुलांचे पिक मिळण्यास सुरूवात होते. पुढील दोन वर्षांपर्यंत रोपट्यांना फुले येतात. यात छोटा डेलीया, मोठा डेलीया, निशिगंधा, मोगरा यांसह विविध फुले उपलब्ध आहेत. हा फुलांचा विक्रेता गेल्या आठ वर्षांपासून व्यवसाय करीत असून, ॲग्रोव्हिजनला येत असल्याचे त्याने सांगितले.

परिषदेत माहिती देताना पाशा पटेल.

पन्नास हजारांत वाइनची निर्मिती

जंगलातील कुठल्याही फळापासून वाइनची निर्मिती होऊ शकते. करवंद, चिकू, काजू आणि जांभळाच्या वाइन निर्मितीला चालना देण्याची गरज आहे. विशेष म्हणजे हा उद्योग घरच्याघरी प्रारंभ होऊ शकतो. केवळ पन्नास हजार रुपयांची गुंतवणूक असलेल्या या उद्योगात शेतकऱ्यांनी पुढकार घ्यावा असे आवाहन राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष पाशा पटेल यांनी केले. राज्य सरकार चिकू, काजू आणि जांभळापासून वाइनची निर्मिती करणाऱ्या उद्योगाला प्रोत्साहन देत आहे. भाजपच्या कार्यकाळात वाइनवरील अबकारी कर कमी करण्यात आला. एका लिटरमागे एक रुपया कर निर्धारित असून, त्याचा फायदा शेतकऱ्यांनी करवून घेण्याची गरज असल्याचे पाशा पटेल म्हणाले. मी स्वत: दापोली येथे जांभळापासून उच्च प्रतीची वाइन बनविली असल्याचे सांगताना कमी गुंतवणुकीत हा उद्योग स्थापन करा, असे पाशा पटेल म्हणाले.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	SAKAL
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

नागपूर : ॲग्रोव्हिजन प्रदर्शनातील 'विदर्भात दुग्ध उत्पादनाचा विकास व दुग्ध प्रक्रियेतील संधी' या कार्यशाळेचे उद्घाटन करताना केंद्रीय पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्य विकास मंत्री गिरिराज सिंह आणि इतर.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER : MAHARASHTRA TIMES
DATE : DT. 24/11/2019
LANGUAGE :
SUBJECT :

आत्महत्यांना वैज्ञानिकही जबाबद

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांचे प्रतिपादन; ॲग्रोव्हिजनमधील परिषदेत विविध मुद्द्यांवर

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

'शेती करणे म्हणजे तोट्याचा सौदा, असे चित्र निर्माण करण्यात आले आहे. महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या ही ज्वलंत समस्या बनली आहे. यासाठी केवळ सरकार नव्हे तर कृषी क्षेत्रातील वैज्ञानिकही तितकेच जबाबदार आहेत', असे प्रतिपादन केंद्रीय पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यविकासमंत्री गिरिराज सिंग यांनी शनिवारी येथे केले.

मध्य भारतातील शेतकऱ्यांना स्वावलंबी, समृद्ध आणि सक्षम करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका वठविणाऱ्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनांतर्गत 'विदर्भात दुग्धोत्पादनाचा विकास आणि प्रक्रिया' विषयावरील परिषदेचे उद्घाटन कविवर्य सुरेश भट सभागृहात झाले. यावेळी केंद्रीय मंत्री गिरिराज सिंग बोलत होते. कार्यक्रमाला राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ, माफसूचे कुलगुरू प्रा. आशिष पातूरकर, डॉ. प्रशांत वासनिक, डॉ. एम. व्ही. पाटील, डॉ. पी. के. घोष, डॉ. आर. डी. कोकणे आदी उपस्थित होते.

'ॲग्रोव्हिजन'मध्ये शनिवारी केंद्रीय पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यविकासमंत्री गिरिराज सिंग यांनी संबोधित केले. 'विदर्भात दुग्धोत्पादनाचा विकास आणि प्रक्रिया' असा विषयावर ही परिषद झाली. व्यासपीठावर राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ, माफसूचे कुलगुरू प्रा. आशिष पातूरकर, डॉ. प्रशांत वासनिक, डॉ. एम. व्ही. पाटील, डॉ. पी. के. घोष, डॉ. आर. डी. कोकणे आदी उपस्थित होते.

गिरिराज सिंग म्हणाले, 'गायीच्या शेणाला प्रतिकिलो पन्नास रुपये दर मिळायला हवा. असा दिवस जेव्हा उजाडेल, तेव्हा गुरेढोरे रस्त्यावर मोकाट दिसणार नाहीत. नागरिक त्या गुरांचे स्वतःच्या घरी पालनपोषण करतील. भविष्यात शेतकरी हा समाजाचा 'लीडर' म्हणून उदयास येईल. तोच सर्वांचे नेतृत्व करेल. त्यासाठी कृषी आणि पशू विद्यापीठांनी, संशोधकांनी शेतकरीहिताय संशोधन करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांनीही पारंपरिक शेतीऐवजी पीक पॅटर्न बदलायल उत्पन्न मिळवून देण अपारंपरिक पिकांची शेतकऱ्यांनी पुढाकार घे आजघडीला पशू आणि ७५ हजार कोटींची निर वाढविण्यासाठी शेतकऱ दुग्ध आणि पशुउत्पा उतरण्याची गरज आहे

गोरसपाकचे होणार मार्केटिंग

वर्धा जिल्ह्याची स्पेशालिटी म्हणजे गोरसपाक. दूध, तूप, बेमालूम मिश्रणाने गोरसपाक तयार केला जातो. म माध्यमातून गोरसपाकचे जोरदार मार्केटिंग करण्यात येणा दिवसांपूर्वीच लॉन्च करण्यात आलेल्या मावा संत्राबर्फीला आहे. त्याच धर्तीवर गोरसपाक केवळ वर्धा जिल्ह्यापुरता सर्वत्र प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय मंडळाचे अध्यक्ष दिलीप रथ यांनी दिली.

PUNNYA NAGARI
(MARATHI)
DT. 24/11/2019

पशुधन विकास व शेती व्यवसाय एकमेकांना पूरक

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह यांचे प्रतिपादन

ॲग्रो व्हिजन प्रदर्शनात कार्यशाळा

पुण्य नगरी / प्रतिनिधी

नागपूर : पशुसंवर्धन आणि शेती व्यवसाय हे एकमेकांना पूरक आहेत. दुधाळू जनावरांइतकीच भाकड जनावरेसुद्धा उपयुक्त असून, त्यांच्या शेण व मलमूत्राचा वापर शेतकऱ्यांनी रासायनिक खत म्हणून केल्यास शेतीवरील रासायनिक खतांचा भार कमी होईल व कृषी उत्पादनातसुद्धा वाढ होईल, असे प्रतिपादन केंद्रीय पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्यविकास मंत्री गिरिराज सिंह यांनी केले.

नागपुरातील रेशीमबाग मैदानावर ११ व्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनानिमित्त कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित 'विदर्भात दुग्ध उत्पादनाचा विकास व दुग्धप्रक्रियेतील संधी' या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन गिरिराज सिंह यांच्या हस्ते शनिवारी सकाळी झाले. या प्रसंगी राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाचे (एनडीडीबी) अध्यक्ष दिलीप रथ, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आशीष पातुरकर, यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. केवळ शेती आधारित व्यवसायामुळे एखाद्याला वर्षात १०० दिवस रोजगार मिळत असेल तर तोच रोजगार पशुपालन व्यवसायामुळे वर्षातील ३०० दिवससुद्धा मिळण्याची शक्यता असते. कुक्कुट पालन, बकरी पालन यातून होणाऱ्या मूत्र व विष्ठेचे कंपोस्ट करून त्याच्या सेंद्रिय खताची निर्मिती करण्याकरिता शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन गिरिराज सिंह यांनी केले. तरुण पिढीने कृषी संशोधन तसेच पशुसंवर्धन विकास यासंदर्भातील शिक्षण अभ्यासक्रमाकडे वळावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली. या कार्यशाळेला राज्यातील विविध भागांतून आलेले पशुपालक व दुग्ध व्यवसायातील संस्था, राज्य व केंद्र शासनाच्या दुग्धविकास व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

- एनडीडीबी (नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड) मार्फत प्रगतिशील शेतकऱ्यांच्या मायक्रो ट्रेनिंग सेंटरची स्थापना करण्याचा निर्णय झाला आहे. या सेंटर्समार्फत चारा उत्पादन, पशुपालन यासंदर्भातील शास्त्रशुद्ध ज्ञान शेतकऱ्यांना देण्यात येईल. असे सहा सेंटर तीन जिल्ह्यांत स्थापन करण्यात येणार आहेत. हायब्रीड नेपियर, मोरिंगा, मका, या चारासदृश पशुखाद्याच्या वापरासाठी शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

- एनडीडीबीने विदर्भातील शेतकऱ्यांकडून दूध संकलनामध्ये नवे विक्रम प्रस्थापित केले असून, शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये दूधसंकलनाची रक्कम थेट पोहोचत असल्याचे एनडीडीबीचे अध्यक्ष दिलीप रथ यांनी यावेळी सांगितले. मार्च महिन्यापर्यंत दूध संकलनासाठी ३ हजार गावांमध्ये दहा हजार शेतकऱ्यांना जोडणार असून, दूध संकलनाचे लक्ष साडेतीन लाख लिटर प्रति दिवस करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	LOKMAT
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

अॅग्रोव्हिजनतर्फे कविवर्य सुरेश भट सभागृहात 'विदर्भातील दुग्धोत्पादन आणि प्रक्रिया' या विषयावर आयोजित कार्यशाळेत विचार व्यक्त करताना केंद्रीय पशुधन दुग्धविकास आणि मत्स्यपालन मंत्री गिरीराज सिंह. मंचावर एनडीडीबीचे अध्यक्ष दिलीप रथ, कृषी शास्त्रज्ञ नेमणूक मंडळाचे अध्यक्ष डॉ. ए.के. मिश्रा, माफसूचे कुलगुरु डॉ. आशिष पातूरकर आदी उपस्थित होते. संजय लचुरिया

पशुधनानेच होणार शेतकरी विकास

गिरीराज सिंह । अॅग्रो व्हिजनमध्ये डेअरी विकासावर कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : देशात शेतजमिनीच्या तुलनेत उत्पादन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पशुधन वाढवून स्वतःचा विकास करावा आणि उत्पन्न वाढवावे. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत निश्चितच वाढ होणार आहे. देशात पशुधन वाढल्यास शेतकरी आणि युवकांच्या रोजगारात वाढ होईल. पशुधनाने शेतकऱ्यांना ३६५ दिवस निश्चितच काम मिळणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय पशुधन दुग्ध विकास आणि मत्सपालन मंत्री गिरीराज सिंह यांनी येथे केले.

अॅग्रोव्हिजनतर्फे रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात 'विदर्भातील दुग्धोत्पादन आणि प्रक्रिया' या विषयावर आयोजित कार्यशाळेत मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. मंचावर एनडीडीबीचे अध्यक्ष दिलीप रथ, कृषी शास्त्रज्ञ नेमणूक मंडळाचे अध्यक्ष डॉ. ए.के. मिश्रा, माफसुचे कुलगुरु डॉ. आशिष पातुरकर, डेअरी तंत्रज्ञान महाविद्यालयाचे डीन डॉ. प्रशांत वासनिक, मीरत येथील पशुसंशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन.व्ही. पाटील, पशुसंशोधन संस्थेचे माजी संचालक डॉ. पी.के. घोष, इंडियन डेअरी असोसिएशनचे चेअरमन डॉ. आर.डी. कोकणे, डॉ. सत्येंदर सिंग आर्य, लक्ष्मीनारायण मिश्रा, सत्राचे समन्वयक डॉ. सी.डी. मायी आणि रवी बोरटकर उपस्थित होते.

दुधासोबत चाऱ्याचे उत्पादन वाढवावे लागेल. शेतकरी आपल्या मुलाला शेतकरी बनविण्यास उत्सुक नाही, ही देशाची शोकांतिका आहे. शेतीचे गुंतवणूक मूल्य कमी झाल्यास लोक शेतीकडे वळतील, असे मत गिरीराज सिंह यांनी व्यक्त केले.

दिलीप रथ म्हणाले, विदर्भात दुग्ध उत्पादनाच्या क्षेत्रात अॅग्रोव्हिजनमुळे मोठे परिवर्तन आले आहे. पुढील दोन वर्षात दररोज ३.५ लाख लिटर दूध संकलनाचे मदर डेअरीचे लक्ष्य आहे. प्रास्तविक डॉ. सी.डी. मायी यांनी तर आभार रवी बोरटकर यांनी मानले. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गडकरींचे कार्य प्रेरणादायी

अॅग्रो व्हिजन
२२ ते २५ नोव्हेंबर २०१९

अॅग्रो व्हिजनच्या माध्यमातून शेतकरी आणि नवयुवकांना माहिती देण्याचे नितीन गडकरी यांचे कार्य सर्वोत्तम असल्याचे गिरीराज सिंह यांनी सांगितले. ते म्हणाले, शेतकऱ्यांनी पिकाचे पॅटर्न बदलवावे. सोबतच पशुधनाचा अवलंब करावा. देशात १.७० दशलक्ष टन दुधाचे उत्पादन होते. ते दरवर्षी वाढत आहे. डेअरीमध्ये २२ टक्के वाटा आहे. कृषी आधारित पशुधन असते तर देशाचा विकास वेगात झाला असता. देशात पशुधनाची निर्यात ७५ ते ८० हजार कोटींची आहे. ती टेक्सटाईल उद्योगापेक्षा दुप्पट आहे. कृषी आधारित अन्न प्रक्रिया उद्योगात कोट्यवधींची गुंतवणूक होणार असल्याचे सीआयआरने म्हटले आहे. ही देशासाठी गौरवाची बाब आहे.

कृषिआधारित पशुधन यातच शेतकऱ्यांची उन्नती

■ गिरीराज सिंग यांचे प्रतिपादन ■ विदर्भातील दुग्धविकास व प्रक्रिया संधी परिषद

लोकशाही वार्ता/नागपूर

केवळ धान्यशेती आणि पारंपरिक शेती करुन शेतकऱ्यांचा विकास आणि उत्कर्ष शक्य नाही तर कृषिआधारित पशुधन ही काळाची गरज असून त्यातच शेतकऱ्यांची उन्नती असल्याचे प्रतिपादन केंद्रीय दुग्धव्यवसाय आणि पशुधन विकास मंत्री गिरीराज सिंग यांनी केले.

मध्यभारतातील सर्वात मोठया ॲग्रो व्हिजन या राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात आज स्थानिक कविवर्य सुरेश भट सभागृहात विदर्भातील डेअरी विकास आणि प्रक्रिया संधी या विषयावर एक दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन गिरीराज सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचे अध्यक्ष दिलीप रथ, डॉ. सी. डी. मायी, रवींद्र बोरटकर, म्हापसूचे कुलगुरु डॉ. आशीष पातुरकर, अधिष्ठाता प्रशांत वासनिक, कापूस अनुसंधान केंद्राचे संचालक एम. बी. पाटील, पी. के. घोष, एन. पी. दक्षिणकर व डॉ. आर. डी. कोकणे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना गिरीराज सिंग यांनी, काळाची गरज लक्षात घेता शेतकऱ्यांनी पिकांचा पॅटर्न बदलण्याची गरज आहे. सध्या भारत दुग्ध उत्पादनात अग्रणी आहे पण त्याचे उत्पादन मूल्य अधिक असल्यामुळे ते परवडत नाही आणि शेतकऱ्यांना त्यातून लाभ होत नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी दोन किवा पाच गायी पाळाव्या, त्यातून सेंद्रीय खत, गांडुळ खताची निर्मिती होईल व त्यावर आधारित चारा उत्पादन आणि सोबतीला कुक्कुटपालन केल्यास कोंबडयांना यातून खाद्य मिळेल व दूध, चारा, पशुखाद्य, बायोगॅस, शेतीला उत्तम खत असा लाभदायी क्रम शेतकऱ्यांना आखणे शक्य होईल. आगामी दहा वर्षात या क्षेत्रात मोठया प्रमाणावर मोठी विदेशी गुंतवणूक अपेक्षित आहे.

यासोबतच दूध उत्पादनानंतर त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग येतील आणि शेतकऱ्यांना लाभ होईल. आगामी काळात अन्नप्रक्रिया उद्योगातील व्यक्तीच देशाचे नेतृत्व करेल असा विश्वास गिरीराज सिंग यांनी व्यक्त केला.

दीप प्रज्ज्वलन आणि औपचारिक स्वागतानंतर प्रास्ताविकातून डॉ. सी. डी. मायी यांनी शेतीला पर्याय म्हणून आणि शेती लाभदायी व्हावी या हेतूने ॲग्रो व्हिजन सुरू केले. त्याचा बराच लाभ शेतकऱ्यांना झाला आणि दुग्ध उत्पादनात वाढ झाली असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे कुलगुरु डॉ. पातुरकर यांनी, दुग्धउत्पादनात वाढ करण्यासाठी सकस चाऱ्याची व्यवस्था जनावरांसाठी करावी लागेल, त्यासाठी आम्ही टाकाऊ चाऱ्यावर प्रक्रिया करुन ते जनावरांना खाण्यासाठी योग्य प्रकारे तयार करण्यासाठी करार केला असल्याचे सांगितले. परिषदेचे सुरेख संचालन रेणुका देशकर यांनी केले तर आभार प्रदर्शन रवींद्र बोरटकर यांनी केले.

म्हापसूच्या जागेवर चारा निर्मिती : दिलीप रथ

येत्या काळात विदर्भातील दूध उत्पादन ३ ते ४ लाख लिटर पर्यंत नेण्यासाठी आम्ही योजना आखली असून त्यासाठी चारा निर्मिती ही महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी एनडीडीबी आणि म्हापसू यांच्यात करार झाला असून विद्यापीठाच्या मोकळ्या जागेवर चारा निर्मिती करणार असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे. यासोबतच अमरावती व वर्धा येथे कृषी प्रशिक्षण केंद्र देखील सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिलीप रथ यांनी दिली.

LOKSHAHI VARTA
DT. 24/11/2019

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	LOKSHAHI VARTA
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

ॲग्रोव्हिजन मध्ये नितीन गडकरी यांनी नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे विकसित शेतीच्या मॉडेलची पाहणी केली

कृषि प्रदर्शनात इथेनॉलवर चालणाऱ्या स्कुटरचेही स्टॉल लागले आहेत खुद गडकरींनी स्कूटरची पाहणी केली

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	TARUN BHARAT
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

रासायनिक खतांचा वापर प्रमाणातच व्हावा

• सुशील देसाई आणि वरुण गोयल यांचे मत • रासायनिक खतांच्या वापरावर कार्यशाळा

◆ नागपूर, २३ नोव्हेंबर

कीटकनाशकात मोठ्या प्रमाणात रसायने असतात. त्यामुळे विषबाधा होण्याची शक्यताही मोठ्या प्रमाणात असते. रासायनिक खतांमुळे कुठलाही धोका होऊ नये म्हणून या रसायनांची फवारणी करताना खतांच्या सोबत येणारे विवरण वाचून सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि रासायनिक खतांचा उपयोग योग्य प्रमाणातच करावा, असे आवाहन बायर क्रॉप सायन्सचे सुशील देसाई यांनी केले.

ॲग्रो व्हिजन या शेतकऱ्यांसाठी आयोजित प्रदर्शनात विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी रासायनिक खतांचा वापर या विषयावरील कार्यशाळेत ते मार्गदर्शन करीत होते. रासायनिक खतांचा उपयोग करताना काही दुर्दैवी घटना घडल्या पण तो दोष रासायनिक खतांचा नसून शेतकऱ्यांनी सुरक्षिततेचे मापदंड पाळले नाहीत, याचा आहे. ही खते बाळगणारे आणि विक्रेते, ग्राहक यांच्या सुरक्षेसह पर्यावरणाचीही हानी होणार नाही, यादृष्टीने रासायनिक खतांचा उपयोग आपण मर्यादित करायला हवा. रसायनांमुळे प्रामुख्याने तोंडावाटे, त्वचेवाटे, श्वासावाटे विषबाधा होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा उपयोग करताना टोपी, गॉगल, मास्क, हातमोजे, रबराचे बूट्स घालायलाच हवे. त्याशिवाय रासायनिक खतांचा उपयोग करणे म्हणजे जिवाशीच खेळ आहे.

लहान मुलांपासून आणि खाण्यापिण्याच्या वस्तूंपासून, हे रासायनिक खत वेगळे ठेवायला हवे. या खतांचे मिश्रण करतानाही पाण्याच्या साहाय्याने काठीच्या मदतीने ते केले पाहिजे. आवश्यक असेल तिथेच योग्य प्रमाणात या रसायनांचा उपयोग केल्यास आपल्याला आणि पर्यावरणाला याचा काहीही धोका होत नाही, असे ते म्हणाले.

एफएमसी कंपनीचे वरुण गोयल यांनी यावेळी कंपनीतर्फे रासायनिक खतांच्या उपपयोगाबाबात राज्यात सहा हजार शेतकऱ्यांना प्रशिक्षित केल्याचे सांगितले. अमेरिकन लष्करी अळीच्या प्रादुर्भावाने अनेक पिके गेली. त्यामुळे आम्ही त्यावर संशोधन करून या अळीचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणला आहे. यासंदर्भात सातत्याने जागरूकता निर्माण करण्यात येत असून त्यासाठी व्हॉट्सॲप ग्रुपही करण्यात आल्याची माहिती त्यांनी शेतकऱ्यांना दिली.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

कापसाचा थेट व्यवसाय जागतिक पातळीवर : दक्षा जानी

'कापसाच्या अवैध व्यवहाराबाबत जागरूकता' कार्यशाळा

◆ नागपूर, २३ नोव्हेंबर

पांढर सोनं म्हटल्या जाणारा कापूस हा शेतकरी दिवसरात्र मेहनत करून पिकवितो आणि बाजारपेठेत विक्रीस नेतो. परंतु, दुर्दैवाने पाहिजे तसा भाव शेतकऱ्याला मिळत नाही. बदलत्या काळानुसार शेतकरी एमसीएक्सच्या साहाय्याने आपल्या कापसाचा व्यवसाय थेट जागतिक पातळीवर करू शकतो, असे प्रतिपादन एमसीएक्सच्या दक्षा जानी यांनी केले.

रेशीमबाग येथे सुरू असलेल्या ॲग्रो व्हिजनमध्ये आयोजित 'कापसाच्या अवैध व्यवहाराबाबत जागरूकता' या विषयावरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

मदतीने शेतकरी घरबसल्या आपल्या कापसाचा आर्थिक व्यवहार जगभर करू शकतो. तसेच अमेरिकेसारख्या देशामध्ये कापसाला किती हमीभाव आहे, याची माहिती मिळविता येते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'देशातील शेतकऱ्यांची आवक दुप्पट झाली पाहिजे' अशी मनीषा आहे. परंतु, असे होत नाही. एमसीएक्सच्या माध्यमातून शेतकरी कापूस आणि फायबर या दोन्हीचा स्वतंत्र व्यवसाय करू शकतो. तसेच त्याला हमीभावही अधिक मिळतो. त्यामुळे एमसीएक्स हा शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन विक्रीचा उत्तम पर्याय असल्याचेही त्यांनी

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	TARUN BHARAT
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

आवडीचा विषय... शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सतत झटणारे नितीन गडकरी यांच्या प्रेरणेने ॲग्रो व्हिजनची दशकपूर्ती झाली. शुक्रवारपासून प्रारंभ झालेल्या प्रदर्शनातील स्टॉल्सला शनिवारी दुपारी गडकरींनी भेट दिली. त्यातही जलसंधारण हा त्यांचा आवडीचा विषय. यासाठी त्यांनी पूर्ती सिंचन समृद्धीच्या स्टॉलला भेट देऊन माधव कोटस्थाने व दत्ता जामदार यांच्याशी चर्चा करून प्रगतीची माहिती घेतली.

शेडनेट हाऊससाठी जागेची निवड महत्त्वाची

हेमंत जगताप यांचे प्रतिपादन

हरितगृह तंत्रज्ञान व शेडनेट

◆ नागपूर, २३ नोव्हेंबर

भाजीपाला आणि फूलशेती करण्यासाठी शेडनेट हाऊस उभारणे जितके आवश्यक आहे, त्याहूनही अधिक शेडनेट लागणाऱ्या जागेची निवड व ते कोणत्या दिशेला असावे हे निश्चित करणे सर्वात महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन हायटेक ॲग्रो औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य हेमंत जगताप यांनी केले.

रेशीमबाग मैदानावर ॲग्रो व्हिजन या नावाने मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. याअंतर्गत शनिवारी सभागृह क्रमांक ३ येथे घेण्यात आलेल्या 'हरितगृह तंत्रज्ञान व शेडनेट' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

जगताप पुढे म्हणाले, शेडनेट उभारण्यात येणारी जागा ही पूर्णपणे सपाट असावी, जागेच्या आजूबाजूला उंच झाडे नसावी. जेणेकरून सूर्यप्रकाश अडविला जाणार नाही तसेच त्या जागेवरून उच्चदाब वीजवाहिनी गेलेली नसावी. शिवाय वारे पश्चिमेकडून पूर्वकडे वाहणारे असल्याने शेडनेटची दिशा दक्षिण-उत्तर असायला पाहिजे. शेडनेटचे सपाट छताचे व गोलाकार छताचे असे मुख्यतः दोन प्रकार आहेत. सरकारने दिलेल्या मार्गदर्शन तत्त्वानुसार सपाट शेडनेट सव्वा तीन किंवा चार मीटर उंचीचे तर गोलाकार शेडनेट चार किंवा पाच मीटर उंचीचे असावे. शेडनेट उभारणीसाठी जमिनीचे क्षेत्र कमीत कमी १० गुंठे तर जास्तीत जास्त एक एकरापर्यंत असले पाहिजे. या बाबींची

शेतकऱ्यांनी पूर्तता केली असेल तरच शासनाकडून त्यांना ५० टक्के अनुदान दिले जाते. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांच्या नावाने सात-बारा व नमुना आठ (अ) असणे आवश्यक आहे. दरवर्षी एप्रिल ते मे महिन्यादरम्यान शासनातर्फे ऑनलाईन अर्ज मागविले जात असून नाव नोंदणी करण्यासाठी सात-बारा, नमुना आठ (अ), आधार कार्ड, बँक पासबूक व पासपोर्ट फोटो ही सर्व कागदपत्रे अपलोड करायची आहेत. त्याशिवाय इतर पद्धतीने या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर पुणे, नाशिक, जालना, अकोला व राहुरी या ठिकाणांपैकी एका प्रशिक्षण केंद्रात पाच दिवसांचे प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे.

विशेषतः तापमान, आर्द्रता, सूर्यप्रकाश व कार्बनडाय ऑक्साईड हे चार घटक शेडनेटच्या माध्यमातून नियंत्रित केले जातात. त्यामुळे प्रबळ इच्छाशक्ती, संयम व स्वतः हा व्यवसाय केल्यास या व्यवसायात यश निश्चित आहे, असेही हेमंत जगताप म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

५० टक्के शेतकरी येथे चुकतात

बाहेरील वातावरणात लावण्यात आलेली पिकाची जात व शेडनेटमध्ये लावण्यात आलेल्या पिकाच्या जातीचे बियाणे हे वेगळे आहेत. मात्र, बियाणे विक्री करणारी कंपनी शेतकऱ्यांना चुकीचे मार्गदर्शन करून शेडनेटमध्ये लावण्यात येणाऱ्या पिकासाठी बाहेरील वातावरणातील बियाणे देतात आणि येथेच ५० टक्के शेतकरी चुकतात. त्यामुळे यासंबंधी शेतकऱ्यांनी कायम जागृत राहावे, असेही आवाहन जगताप यांनी यावेळी केले.

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	TARUN BHARAT
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

...अन् ८० महिला बनल्या ट्रॅक्टरचालक

बहुपीक पद्धती शेतकऱ्याला जगवेल

यशस्वी शेतकऱ्याची यशोगाथा

◆ नागपूर, २३ नोव्हेंबर

ट्रॅक्टरच्या मदतीने शेतीला नांगरले, वखरले जाते. यासाठी पुरुषांचीच मदत घेतली जाते. मात्र, मजुरी कमी मिळते म्हणून पुरुष मजूर शेतीपासून दूर जात आहेत. यावर पर्याय म्हणून चक्क ८० महिलांना ट्रॅक्टर चालविण्याचे प्रशिक्षण देऊन तयार केले आहे. आता त्या महिला ट्रॅक्टर चालवितात. यासाठी ट्रॅक्टर कंपनीनेही मदत केली. शेतकरी आणि शेतमजुरांसाठी हे आदर्श उदाहरण आहे, अशी माहिती कोंढाळी तालुक्यातील यशस्वी शेतकरी अनंत भोयर यांनी दिली. ॲग्रो व्हिजन प्रदर्शनात सेंद्रिय शेतीवर ते बोलत होते.

यशस्वी शेतीचा मंत्र देताना भोयर पुढे म्हणाले की, डॉक्टरचा मुलगा वैद्यकीय व्यवसायाकडे वळतो. इंजिनीअरचा मुलगा इंजिनीअर होतो. मग शेतकऱ्याचा मुलगा आधुनिक पद्धतीने शेती करून आदर्श निर्माण करताना दिसत नाही. त्याचे कारणही तेवढेच सबळ आहे. आजचा शेतकरी हा एकाच पिकावर अवलंबून आहे. एकापेक्षा अधिक पिके घेतली तरी शेतकरी जगेल आणि इतरांनाही जगवेल. त्यामुळे बहुपीक पद्धतीकडे वळा, असे कळकळीचे आवाहन भोयर यांनी केले. आपल्याकडे एकच पीक घेण्याची पद्धत आहे. विदर्भातील सर्वच शेतकऱ्यांनी एकच पीक घेतले तर बाजारात मोठ्या प्रमाणात उत्पादन येईल आणि त्या उत्पादनाला मागणी राहणार नाही. मागणी नसली की त्या मालाची किंमत नाममात्र असेल. त्यामुळे बहुपीक पद्धतीने शेती करा; असा सल्ला त्यांनी दिला. यशस्वी शेतीचा मंत्र देताना त्यांनी सांगितले की, आपल्याकडे असलेल्या १४ एकर शेतीमध्ये कुठल्याही प्रकारचे रसायन न वापरता शेतीला सुरुवात केली. सेंद्रिय पद्धतीने शेती करीत असताना सुरुवातीला काहीच फायदा झाला नाही. मात्र, हताश होऊन सेंद्रिय शेती बंद केली नाही. ते काम निरंतर सुरू होते. हळूहळू संपूर्ण जमीन सेंद्रिय झाली. त्यानंतर सेंद्रिय पद्धतीने पिके घेण्यास सुरुवात केली. आज त्या पिकाला मोठी मागणी आहे.

विशेष म्हणजे जे पीक घेण्याचा विचारही शेतकरी करीत नाही. अशी पिके घेऊन शेतकऱ्यांपुढे एक आदर्श निर्माण केला. एवढेच काय तर एक सोलर ड्रायर मॉडेल तयार केला. अशा प्रकारचे मॉडेल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. या मॉडेलला मागणी आहे. सोलर मॉडेलच्या मदतीने शेतातच अंबाडीची भाजी वाळवून विविध प्रकारच्या वस्तू तयार करत असल्याचे त्यांनी सांगितले. हे सोलर मॉडेल दिल्ली, पंजाब आणि इतर ठिकाणी वापरले जात आहे. याशिवाय गावकूस नावाचा एक ग्रुप तयार केला. त्या माध्यमातून अनेकांना जोडले आहे. महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. शेतकरी ते ग्राहक अशी थेट विक्री संकल्पना मांडली. जी डाळ दुकानात ७० रुपये किलोप्रमाणे मिळते, तीच डाळ जात्यावर दळून त्याचे सत्त्व कायम ठेवण्यासाठी शेतीवर काम करणाऱ्या महिलांच्या हाताला काम मिळाले आहे. त्यामुळे १२० रुपये किलोप्रमाणे आमच्याकडे डाळ मिळत असली तरी लोक आनंदाने विकत घेतात, असेही त्यांनी सांगितले.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

PRESS INFORMATION BUREAU
GOVERNMENT OF INDIA
NAGPUR
***

NAME OF NEWSPAPER	TARUN BHARAT
DATE	24/11/2019
LANGUAGE	MARATHI
SUBJECT	

कृषिआधारित पशुधनातच शेतकऱ्यांची उन्नती

गिरीराज सिंग यांचे प्रतिपादन

विदर्भातील दुग्धविकास व प्रक्रिया संधी परिषद

◆ नागपूर, २३ नोव्हेंबर

केवळ धान्य शेती आणि पारंपरिक शेती करून शेतकऱ्यांचा विकास आणि उत्कर्ष शक्य नाही तर कृषिआधारित पशुधन ही काळाची गरज असून त्यातच शेतकऱ्यांची उन्नती असल्याचे प्रतिपादन केंद्रीय दुग्ध व्यवसाय आणि पशुधन विकास मंत्री गिरीराज सिंग यांनी केले.

मध्य भारतातील सर्वात मोठ्या ॲग्रो व्हिजन या राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात आज शनिवारी स्थानिक महाकवी सुरेश भट सभागृहात विदर्भातील डेअरी विकास आणि प्रक्रिया संधी या विषयावर एक दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन गिरीराज सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डचे अध्यक्ष दिलीप रथ, डॉ. सी. डी. मायी, रवींद्र बोरटकर, म्हापसूचे कुलगुरू डॉ. आशीष पातुरकर, अधिष्ठाता प्रशांत वासनिक, कापूस अनुसंधान केंद्राचे संचालक एम. बी. पाटील, पी. के. घोष, एन. पी. दक्षिणकर व डॉ. आर. डी. कोकणे व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना गिरीराज सिंग यांनी, काळाची गरज लक्षात घेता शेतकऱ्यांनी पिकांचा पॅटर्न बदलण्याची गरज आहे. सध्या भारत दुग्ध उत्पादनात अग्रणी आहे पण त्याचे उत्पादन मूल्य अधिक असल्यामुळे ते परवडत नाही आणि शेतकऱ्यांना त्यातून लाभ होत नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी दोन किंवा पाच गायी पाळाव्या, त्यातून सेंद्रिय खत, गांडूळ खताची निर्मिती होईल व त्यावर आधारित चारा उत्पादन आणि सोबतीला कुक्कुटपालन केल्यास कोंबड्यांना यातून खाद्य मिळेल व दूध, चारा, पशुखाद्य, बायोगॅस, शेतीला उत्तम खत असा लाभदायी क्रम शेतकऱ्यांना आखणे शक्य होईल. आगामी दहा वर्षात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर मोठी विदेशी गुंतवणूक अपेक्षित आहे. यासोबतच दूध उत्पादनानंतर त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग येतील आणि शेतकऱ्यांना लाभ होईल. आगामी काळात अन्न प्रक्रिया उद्योगातील व्यक्तीच देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास गिरीराज सिंग यांनी व्यक्त केला.

दीपप्रज्वलन आणि औपचारिक स्वागतानंतर प्रास्ताविकातून डॉ. सी. डी. मायी यांनी, शेतीला पर्याय म्हणून आणि शेती लाभदायी व्हावी या हेतूने ॲग्रो व्हिजन सुरू केले. त्याचा बराच लाभ शेतकऱ्यांना झाला आणि दुग्ध उत्पादनात वाढ झाली असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे कुलगुरू डॉ. पातुरकर यांनी, दुग्ध उत्पादनात वाढ करण्यासाठी सकस चाऱ्याची व्यवस्था जनावरांसाठी करावी लागेल, त्यासाठी आम्ही टाकाऊ चाऱ्यावर प्रक्रिया करून ते जनावरांना खाण्यासाठी योग्यप्रकारे तयार करण्यासाठी करार केला असल्याचे सांगितले. परिषदेचे सुरेख संचालन रेणुका देशकर यांनी केले तर आभारप्रदर्शन रवींद्र बोरटकर यांनी केले. *(तभा वृत्तसेवा)*

म्हापसूच्या जागेवर चारा निर्मिती : दिलीप रथ

येत्या काळात विदर्भातील दूध उत्पादन ३ ते ४ लाख लिटरपर्यंत नेण्यासाठी आम्ही योजना आखली असून त्यासाठी चारा निर्मिती ही महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी एनडीडीबी आणि म्हापसू यांच्यात करार झाला असून विद्यापीठाच्या मोकळ्या जागेवर चारा निर्मिती करणार असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे. सोबतच अमरावती व वर्धा येथे कृषी प्रशिक्षण केंद्र देखील सुरू करण्यात येणार असल्याची माहिती दिलीप रथ यांनी दिली.

TARUN BHARAT DT. 24/11/2019

रंगीत कापसाला युरोपियन बाजारात मागणी

ॲग्रो व्हिजन कार्यशाळेत डॉ. गोतमारे यांची माहिती

◆ नागपूर, २३ नोव्हेंबर

नैसर्गिकरीत्या उत्पादित होणाऱ्या रंगीत कापसाची युरोपियन बाजारपेठेत बऱ्यापैकी मागणी आहे. रंगीत कापसापासून तयार करण्यात येणारा धागा हा आखूड असून, यातून खादी ग्राम उद्योगाच्या सहकार्याने हातमागाचे कपडे तयार केले जाऊ शकतात, अशी माहिती सीआयसीआरच्या डॉ. विनिता गोतमारे यांनी दिली.

रेशीमबाग येथे सुरू असलेल्या 'ॲग्रो - व्हिजन'मध्ये आयोजित 'रंगीत कापूस' या विषयांवरील कार्यशाळेत त्या बोलत होत्या. डॉ. गोतमारे म्हणाल्या की, वस्त्रोद्योग व

वैद्यकीय क्षेत्रात मोठा वाव आहे. या रंगीत कापसाला सक्षम बाजारपेठ मिळाली व त्याचे प्रभावी ब्रँडिंग झाल्यास भारतीय कापूस उत्पादकाला जागतिक स्तरावर पोचण्याची संधी मिळेल.

कपाशीला पांढरे सोने म्हटले जाते. याच कापसावर कृत्रिम रासायनिक रंगद्रव्यांची (डाई) प्रक्रिया करून रंगीत वस्त्रे तयार केली जातात. मात्र सध्याच्या काळात रासायनिक कीडनाशकांचा वापर न करता पिकवलेला कापूस व पुढे त्या आधारे कृत्रिम रंगद्रव्यांचा वापर न केलेल्या उत्पादित केलेल्या पर्यावरणपूरक वस्त्रांना जगभरातील ग्राहक पसंती देत आहेत.

त्या दृष्टीने उपयोगी ठरणारा आणि नैसर्गिक तपकिरी रंग असलेला कापूस नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या प्रक्षेत्रात तीन हेक्टरवर दिमाखात फुलतो आहे. भारत आणि इतर देशांमध्ये अंदाजे २०० एकरमध्ये याची शेती केली जात आहे. सध्या भारतात रंगीत कपाशीचा हमीभाव ठरलेला नसल्याने देशातील बाजारात मागणी कमी आहे. या उलट युरोपियन बाजारपेठेत ५ ते ६ क्विंटलची मागणी आहे.

शेतकऱ्यांची करार करून याचा हमीभाव निश्चित करता येतो. त्यामुळे भविष्यात हा कापूस शेतकऱ्यांसाठी मदतगार ठरू शकतो.

◀ (तभा वृत्तसेवा)

ॲग्रो व्हिजन
कार्यशाळा, राष्ट्रीय कृषि प्रदर्शन व परिसंवाद

शेतकऱ्यांची गर्दी...

मागील दहा वर्षांपासून सातत्याने ॲग्रो व्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन रेशीमबाग मैदानावर होते. यावर्षी अकरावे वर्ष आहे. उद्घाटनानंतर शनिवारी प्रदर्शनातील स्टॉल्सवर आणि कार्यशाळांना अशी गर्दी उसळली होती.